आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com
मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,
PRGI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष १० वे ● अंक ३१९ वा ● रविवार १३ सप्टेंबर २०२६ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●




## दुष्काळी परिस्थितीबाबत तात्काळ अहवाल सादर करा - मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

नागपूर : दुष्काळसदृश परिस्थिती असलेल्या राज्यातील १८ जिल्ह्यांचा आढावा घेण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज या जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांशी दूरदृश्य संवादप्रणालीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) संवाद साधला. मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत निर्णय घेऊन तात्काळ उपाययोजना करता याव्या यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील पिकांच्या झालेल्या नुकसानीसह उद्भवलेल्या परिस्थितीबाबत मुद्देसूद व सविस्तर अहवाल तात्काळ सादर करण्याचे आदेश त्यांनी यावेळी दिले.



बैठकीस खासदार माया इवनाते, सर्वश्री आमदार प्रवीण दटके, मोहन मते, समीर मेघे, चरणसिंग ठाकूर, डॉ.राजीव पोतदार, पोलीस आयुक्त विश्र्वास नांगरे-पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिकेचे आयुक्त विपीन इटनकर, ग्रामीणचे पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांच्यासह विभागप्रमुख उपस्थित ह1ोते.

दुष्काळसदृश परिस्थिती असलेल्या जिल्ह्यांमध्ये अहिल्यानगर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, धाराशिव, बीड, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, वाशीम, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर आणि नंदुरबार या १८ जिल्ह्यांचा समावेश आहे.

मराठवाडा विभागात सोयाबीन, कापूस, तूर, हळद, उडीद आणि मूग, विदर्भात कापूस, मूग, उडीद, तूर तर नागपूर आणि अमरावती जिल्ह्यांत संत्र्याचे नुकसान झाले आहे. ढगाळ वातावरणामुळे संत्रा पिकावर बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाला असून धाराशिव, बीड आणि जालना जिल्ह्यांत जनावरांसाठी चाऱ्याची टंचाई निर्माण झाली आहे. तसेच ऊस कारखाने लवकर सुरू झाल्यास गळीत हंगाम कमी कालावधीचा राहील, ज्यामुळे चाराटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. सोलापूर जिल्ह्यात कांदा लागवड कमी होण्याचा अंदाज असून दुष्काळाबाबत नोंदवण्यात आलेली महत्त्वाची निरीक्षणे पालकमंत्र्यांनी यावेळी जिल्हाधिकाऱ्यांसमोर नोंदवली.

या परिस्थितीवर तात्काळ उपाययोजना करता यावी, म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी सद्य स्थितीचा आढावा घेऊन तातडीने अहवाल सादर करावा. प्राप्त अहवालाच्या आधारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी सविस्तर चर्चा करून प्रभावी उपाययोजना राबविण्यात येतील. या जिल्ह्यांतील स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या सूचना विचारात घेऊन त्यांच्या सहकार्याने या परिस्थितीवर आवश्यक त्या सर्व उपाययोजना प्राधान्याने राबवल्या जातील असे श्री बावनकुळे यांनी सांगितले. यावेळी संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## महामहिम प्रिन्स रहीम आगा खान यांचे मुंबईत स्वागत

मुंबई, : महामहिम प्रिन्स रहीम आगा खान



आणि त्यांच्या शिष्टमंडळाचे आज दुपारी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे आगमन झाले. राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

यावेळी राज्याचे मुख्य राजशिष्टाचार अधिकारी तथा सचिव डॉ. राजेश गवांडे, मुंबईचे अतिरिक्त पोलीस आयुक्त अभिनव देशमुख, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यासह संबंधित अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.त्यानंतर महामहिम प्रिन्स रहीम आगा खान आणि त्यांच्या शिष्टमंडळाने पुढील कार्यक्रमासाठी प्रयाण केले.

## विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग गणेशोत्सव, ज्येष्ठा गौरी सणानिमित्त दोन दिवस बंद

लातूर, : येत्या सोमवारी, १४ सप्टेंबर, २०२६ रोजी गणेश चतुर्थीनिमित्त सार्वजनिक सुट्टी असल्याने तसेच शुक्रवार, १८ सप्टेंबर, २०२६ रोजी लातूर जिल्ह्यात जेष्ठा गौरी सणानिमित्त स्थानिक सुट्टी असल्याने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग बंद राहील.



तसेच सलग सुट्टी जोडून आलेली असल्यामुळे रविवार, १३ सप्टेंबर व गुरुवार, १७ सप्टेंबर, २०२६ रोजी बाह्यरुग्ण विभाग नियमित वेळेत सुरु राहील. बाह्यरुग्ण विभाग दोन दिवस बंद असला, तरी रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास अविरत सुरू राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरुड यांनी कळविले आहे.

## शिक्षण हक्क कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी देखरेख प्रणाली विकसित करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, : महाराष्ट्रातील सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टद्वारे चालविल्या जाणाऱ्या शाळांमध्ये शिक्षण हक्क कायद्याची (RTE) प्रभावी व पारदर्शक अंमलबजावणी व्हावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे.



राज्यातील अशा सर्व अनुदानित आणि विना अनुदानित शाळांवर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी मानक कार्यप्रणाली, संनियंत्रण आणि मूल्यमापन यंत्रणा तातडीने विकसित करावे. धर्मदाय रुग्णालयातील कार्यपद्धतीप्रमाणे धर्मदाय संस्था अंतर्गत कार्यरत शाळांमध्ये शिक्षण हक्क कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी देखरेख कार्यपद्धतीची कायदेशीर प्रक्रिया वेगाने पूर्ण करावी.

महाराष्ट्रामध्ये सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर शाळांचे संचालन केले जाते. या शाळांमध्ये शिक्षण हक्क कायद्यांतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांतील मुलांना प्रवेश मिळणे अनिवार्य आहे. मात्र, या शाळांमधील पारदर्शकता आणि नियमावलीच्या अंमल बजावणीबाबत वारंवार तक्रारी समोर येत होत्या.

या पार्श्र्वभूमीवर, राज्यातील सर्व गरजू आणि पात्र विद्यार्थ्यांना आरटीई कायद्याचा प्रत्यक्ष लाभ मिळावा आणि शिक्षणाचा दर्जा कायम राहावा, यासाठी एक आधुनिक व डिजिटल प्रणाली अस्तित्वात आणणे अत्यावश्यक आहे. सार्वजनिक 'चॅरिटेबल ट्रस्ट'द्वारे चालविल्या जाणाऱ्या रुग्णालयांमध्ये गरीब रुग्णांना मोफत व सवलतीच्या दरात आरोग्य सुविधा मिळतात की नाही, यावर नियंत्रण यंत्रणेद्वारे देखरेख ठेवली जाते, त्याच धर्तीवर आता शाळांसाठीही ही यंत्रणा लागू केली जाणार आहे.

मुख्यमंत्र्यांच्या या विशेष प्रयत्नांमुळे राज्यातील हजारो शाळांमधील प्रवेश प्रक्रिया, शैक्षणिक सोयी-सुविधा आणि आरटीई अंतर्गत मिळणाऱ्या निधीचा योग्य वापर यावर थेट प्रशासकीय लक्ष राहील. तसेच या यंत्रणेद्वारे शाळांचा नियमित आढावा घेणे शक्य होणार असून, गैरप्रकारांना आळा बसण्यास मोठी मदत होणार आहे.

ही प्रणाली लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी विधि व न्याय विभाग, आवश्यक ते तांत्रिक तज्ज्ञ यांच्यामध्ये योग्य तो विचारविनिमय करून एक सर्वसमावेशक प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हा प्रस्ताव तयार झाल्यानंतर त्याला आवश्यक त्या आर्थिक मंजुऱ्या देऊन तातडीने अंमलबजावणी सुरू केली जाणार आहे.

## गणेशभक्तांच्या कोकण प्रवासाला टोलमाफी; गणेशभक्तांना दिलासा - मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोंसले

मुंबई, : गणेशोत्सवाच्या कालावधीत कोकणाकडे जाणाऱ्या गणेशभक्तांच्या वाहनांना पथकरातून (टोल) सवलत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. ११ सप्टेंबर २०२६ ते २७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत मुंबई-बंगळूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील कोकणाकडे जाणाऱ्या संबंधित मार्गांवरील पथकर नाक्यांवर ही टोलमाफी लागू राहणार आहे. याशिवाय नगरविकास विभागाच्या अखत्यारीतील अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतूमार्गे कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांच्या वाहनांनाही पथकरमाफीचा लाभ मिळणार असल्याची माहिती मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी दिली.



गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनातील अत्यंत महत्त्वाचा सण आहे. मुंबई, ठाणे, पुणे आणि राज्यातील इतर शहरांमध्ये वास्तव्यास असलेले हजारो कुटुंबीय गणेशोत्सवासाठी आपल्या मूळ गावी कोकणात जात असतात. या काळात मुंबई-गोवा महामार्गासह कोकणाकडे जाणाऱ्या प्रमुख मार्गांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक वाढते. गणेशभक्तांचा हा प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित आणि आनंददायी व्हावा, तसेच त्यांना प्रवासादरम्यान अनावश्यक आर्थिक भार सहन करावा लागू नये, यासाठी शासनाने टोलमाफीचा निर्णय घेतला आहे.

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोंसले यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक बांधकाम विभागाने याबाबत ८ सप्टेंबर २०२६ रोजी शासन परिपत्रक जारी केले आहे. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागासह पोलीस, वाहतूक पोलीस, प्रादेशिक परिवहन विभाग आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने परस्पर समन्वयाने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

गणेशभक्तांना टोलमाफीचा लाभ घेताना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी 'गणेशोत्सव २०२६ कोकण दर्शन' अशा आशयाचे स्वतंत्र स्टिकर किंवा पास उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या पासवर संबंधित वाहनाचा क्रमांक आणि चालकाचे नाव नमूद केले जाणार आहे. परिवहन विभाग, वाहतूक पोलीस, पोलीस विभाग आणि संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालय यांच्या समन्वयातून आवश्यक त्या ठिकाणी हे पास उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. पोलीस स्टेशन, वाहतूक पोलीस चौक्या तसेच आरटीओ कार्यालयांमध्येही पास उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सदर पास परतीच्या प्रवासासाठीदेखील ग्राह्य धरला जाणार असल्याने कोकणातून परतताना गणेशभक्तांना पुन्हा टोलमाफीचा लाभ मिळणार आहे.

गणेशोत्सवासाठी राज्याच्या विविध जिल्ह्यांतून कोकणात जाणाऱ्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसनाही पथकरमाफी देण्यात येणार आहे. संबंधित जिल्ह्यांतून कोकणाकडे रवाना होणाऱ्या एसटी बससाठी आवश्यक पास संबंधित पोलीस किंवा प्रादेशिक परिवहन विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात येतील. पथकरमाफीचा पास बसला लावून किंवा दाखवून संबंधित बसना टोल नाक्यावरून सवलतीचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे सार्वजनिक वाहतुकीने कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांनाही या निर्णयाचा फायदा होणार आहे.

टोलमाफीच्या निर्णयामुळे टोल नाक्यांवर होणारी गर्दी आणि संभाव्य वाहतूक कोंडी लक्षात घेऊन पोलीस आणि परिवहन विभागाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. गणेशभक्तांना पास मिळविणे, त्याची तपासणी करणे आणि टोलमाफीचा लाभ मिळवून देणे ही प्रक्रिया सुलभ आणि वेगवान करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी आवश्यक नियोजन करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

गणेशोत्सवाच्या कालावधीत टोलमाफीची सुविधा आणि पास उपलब्धतेबाबतची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. त्यासाठी पोलीस आणि परिवहन विभागाने आवश्यकतेनुसार सूचना, जाहिराती आणि जनजागृतीच्या माध्यमातून नागरिकांना माहिती द्यावी, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. कोणत्या मार्गावर टोलमाफी लागू आहे, पास कुठे मिळेल आणि परतीच्या प्रवासासाठी पास कसा ग्राह्य राहील, याबाबत स्पष्ट माहिती गणेशभक्तांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. गणेशोत्सव हा प्रत्येकाच्या भावनेशी जोडलेला सण आहे. आपल्या लाडक्या गणरायाच्या स्वागतासाठी कोकणातील आपल्या गावी जाणाऱ्या गणेशभक्तांचा प्रवास सुरक्षित, सुलभ आणि आनंददायी व्हावा, यासाठी शासनाने टोलमाफीचा निर्णय घेतला आहे. गणेशभक्तांना प्रवासादरम्यान कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी संबंधित सर्व यंत्रणांनी समन्वयाने आणि संवेदनशीलतेने काम करावे, असे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले. गणेशोत्सवाच्या पार्श्र्वभूमीवर घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे मुंबईसह राज्याच्या विविध भागांतून कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना आर्थिक दिलासा मिळणार असून, त्यांच्या प्रवासातील अडथळे कमी होण्यास मदत होणार आहे. गणपती बाप्पाच्या आगमनासाठी कोकणाकडे निघालेल्या भक्तांचा प्रवास सुखकर व्हावा आणि गणेशोत्सवाचा आनंद अधिक द्विगुणित व्हावा, या उद्देशाने शासनाने ही विशेष टोलमाफी लागू केली आहे.

## परीक्षा प्रक्रियेत स्थैर्य, सुरक्षितता आणि पारदर्शकतेला प्राधान्य

पुणे, : महाराष्ट्र लोकसेवा आयोगासह विविध स्पर्धा परीक्षांची प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित, स्थिर आणि उमेदवाराभिमुख करण्यासाठी राज्य शासनाने स्थापन केलेल्या उच्चस्तरीय भरती परीक्षा टास्क फोर्सच्या वतीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे विद्यार्थ्यांसह शिक्षक, पालक आणि अन्य संबंधितांशी सल्लामसलत करण्यात आली. परीक्षा वेळापत्रक, प्रश्र्नपत्रिकेची गुणवत्ता, प्रश्र्नपत्रिका गळतीला प्रतिबंध, पदसंख्या, उत्तरतालिका, परीक्षा केंद्रे, तक्रार निवारण आणि 'ऑप्टिंग आऊट' याबाबत विविध सूचना मांडण्यात आल्या.



सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली भरती परीक्षा टास्क फोर्स समिती कार्यरत आहे. समितीत पोलीस महासंचालक सदानंद दाते, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, संघ लोकसेवा आयोगाचे माजी सदस्य एअर मार्शल अजित शंकरराव भोसले (सेवानिवृत्त) आणि आयआयटी मुंबईचे प्राध्यापक श्यामप्रसाद करगड्डे यांचा समावेश आहे.

टास्क फोर्सकडे आतापर्यंत राज्यभरातून १८ हजारांहून अधिक ई-मेल्स प्राप्त झाले आहेत. परीक्षांचे वार्षिक वेळापत्रक निश्र्चित करून त्याचे पालन करावे तसेच कार्यपद्धतीत वारंवार बदल न करता दीर्घकालीन स्थैर्य द्यावे, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली. विविध संवर्गांसाठी किमान पदसंख्या आधीच जाहीर करण्याची सूचनाही करण्यात आली.

प्रश्र्नपत्रिका तयार करण्यापासून छपाई, वाहतूक आणि वितरणापर्यंतची प्रक्रिया अधिक सुरक्षित करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा समितीचा मानस आहे. प्रश्र्न तयार करणाऱ्या व्यक्तीलाही तो कोणत्या परीक्षेसाठी आहे, याची माहिती नसावी, अशा पद्धतीच्या ई-प्रश्र्नसंचाचा विचार करण्यात येत आहे. 'झिरो लीक' हे परीक्षाप्रक्रियेतील प्रमुख उद्दिष्ट असल्याचे समितीने स्पष्ट केले.

प्रश्र्नपत्रिकेतील त्रुटी आणि उत्तरतालिकेतील चुका टाळण्यासाठी गुणवत्ता नियंत्रणाची प्रक्रिया अधिक काटेकोर करण्याची, तसेच उत्तरपत्रिका तपासणीसाठी समान निकष व परीक्षकांच्या गुणवत्तेची पडताळणी करण्याची सूचना विद्यार्थ्यांनी केली.

उमेदवारांच्या तक्रारी व हरकतींसाठी केंद्रीकृत ऑनलाइन पोर्टल असावे, अशी मागणी करण्यात आली. परीक्षा केंद्रांवर स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी आणि योग्य बैठक व्यवस्था यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावरही भर देण्यात आला. सर्व परीक्षांसाठी एकदाच नोंदणी व शुल्क भरण्याची व्यवस्था करण्याची सूचनाही मांडण्यात आली.

एकाच उमेदवाराला अनेक पदांसाठी पात्रता मिळाल्यास पदनिवड आणि 'ऑप्टिंग आऊट' प्रक्रियेबाबत स्पष्ट धोरण असावे, अशी मागणी करण्यात आली. दिव्यांग व क्रीडा प्रवर्गातील प्रमाणपत्रांची योग्य टप्प्यावर पडताळणी करण्याची सूचनाही करण्यात आली.

दरम्यान, पुढील एक वर्ष ऑनलाइन परीक्षा न घेता ओएमआर पद्धतीनेच परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे व्ही. राधा यांनी स्पष्ट केले. या कालावधीनंतर ओएमआर पद्धतीने परीक्षा घेण्याबाबत शासन स्तरावर आवश्यक तो निर्णय घेण्यात येईल. तसेच, ओएमआर पद्धतीच्या परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि एकसमान पद्धतीने घेण्यासाठी प्रमाणित नियमावली तयार करण्याचे काम सध्या सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

देशातील विविध लोकसेवा आयोगांच्या कार्यपद्धतींचा अभ्यास करण्यात येत असून, तमिळनाडू, गुजरात आणि संघ लोकसेवा आयोगाच्या कार्यपद्धतींचा तुलनात्मक अभ्यास करून महाराष्ट्रासाठी उपयुक्त सुधारणा करण्याचा प्रयत्न सुरू आहे. विद्यार्थ्यांसह सर्व भागधारकांकडून मिळालेल्या सूचनांचा गांभीर्याने विचार करून परीक्षा प्रक्रिया अधिक विश्र्वासार्ह व परिणामकारक केली जाईल, असे व्ही. राधा यांनी सांगितले.

एमपीएससीवरील वाढती जबाबदारी लक्षात घेता आयोगाचे मनुष्यबळ, तांत्रिक क्षमता आणि संस्थात्मक रचना बळकट करण्याची गरजही व्यक्त करण्यात आली. अधिक गतिमान, पारदर्शक आणि उत्तरदायी अधिकारी निवड प्रक्रिया निर्माण करणे हे टास्क फोर्सचे उद्दिष्ट आहे, असे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी सांगितले.

यावेळी विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम आदी उपस्थित होते.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# सचिवांशी गैरवर्तनाच्या निषेधार्थ एमपीएससी अधिकारी-कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सचिव महेंद्र हरपाळकर यांच्याशी ११ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या गैरवर्तनाच्या निषेधार्थ आयोगातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तीव्र निषेध व्यक्त करत काम बंद आंदोलनाचा निर्णय घेतला आहे. आयोगातील अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेची शासनाकडून ठोस, स्पष्ट आणि प्रभावी हमी मिळेपर्यंत हे आंदोलन सुरू ठेवण्याची भूमिका त्यांनी मांडली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग ही संविधानिक संस्था असून सचिव हे आयोगाचे प्रशासकीय प्रमुख आहेत. त्यामुळे प्रशासकीय प्रमुखांशी झालेल्या गैरवर्तनाची घटना ही गंभीर असून, संबंधित व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अधिकारी–कर्मचाऱ्यांनी केली आहे. तसेच आयोगातील अधिकारी–कर्मचाऱ्यांना धमकीवजा वक्तव्ये करण्यात आल्याने त्यांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, आयोगाच्या एका परीक्षेतील पेपरफुटी आणि गैरप्रकारामुळे उमेदवारांमध्ये संताप, अस्वस्थता आणि अविश्र्वास निर्माण झाल्याची भावना अधिकारी–कर्मचाऱ्यांनी समजून घेतली आहे. परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता आणि उमेदवारांच्या भवितव्याशी संबंधित त्यांच्या अपेक्षांचा आदर असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. संबंधित प्रकरणातील दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिकाही त्यांनी व्यक्त केली.

मात्र, एखाद्या व्यक्तीच्या चुकीची जबाबदारी आयोगातील सर्व अधिकारी–कर्मचाऱ्यांवर टाकता येणार नाही. चौकशीपूर्वीच कोणत्याही अधिकारी–कर्मचाऱ्याला दोषी ठरविणे किंवा त्यांच्यावर वैयक्तिक आरोप करणे अन्यायकारक असल्याचे निवेदनात म्हटले आहे. दोषी आणि निर्दोष कोण हे ठरविण्याचा अधिकार न्यायप्रक्रियेलाच असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

न्याय्य मागण्यांसाठी आवाज उठविणे, प्रश्र्न उपस्थित करणे आणि प्रशासनाकडून उत्तरदायित्वाची मागणी करणे हा उमेदवारांचा लोकशाही अधिकार आहे. शांततामय मार्गाने होणाऱ्या आंदोलनाला अधिकारी–कर्मचाऱ्यांचा विरोध नाही. मात्र, आंदोलनाच्या नावाखाली अधिकारी–कर्मचाऱ्यांना अडविणे, त्यांच्याशी गैरवर्तन करणे, दहशतीचे वातावरण निर्माण करणे किंवा त्यांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करणे योग्य नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

आयोगातील अधिकारी–कर्मचारी हे कर्तव्य बजावणारे लोकसेवक असून त्यांना निर्भयपणे आणि कोणत्याही दबावाशिवाय काम करण्याचा अधिकार आहे. कार्यालयात येताना किंवा कामकाज करताना सुरक्षिततेबाबत भीती निर्माण होणे ही गंभीर बाब असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

आयोगातील अधिकारी–कर्मचाऱ्यांची नावे घेऊन त्यांचे नातेवाईक, मित्र–मैत्रिणी यांची आयोगाच्या निवड यादीत नावे असल्याचे सांगत सोशल मीडिया तसेच वृत्तवाहिन्यांवर खोट्या, दिशाभूल करणाऱ्या किंवा बदनामीकारक बातम्या प्रसारित केल्या जात असल्याचा आरोप अधिकारी–कर्मचाऱ्यांनी केला आहे. अशा प्रकारे कोणत्याही सबळ पुराव्याविना अधिकारी–कर्मचारी किंवा त्यांच्या कुटुंबीयांची नावे प्रकरणांमध्ये जोडून प्रसिद्धी केल्यास अब्रुनुकसानीचा दावा किंवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

हे काम बंद आंदोलन उमेदवारांच्या विरोधात नसून, गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई आणि निर्दोष अधिकारी–कर्मचाऱ्यांना संरक्षण या दोन्ही न्याय्य भूमिकांसाठी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

ज्या पारदर्शक प्रक्रियेची मागणी उमेदवारांकडून केली जाते, त्याच प्रक्रियेतून आयोगातील अधिकारी–कर्मचारी शासन सेवेत दाखल झाले आहेत. आयोगातील अधिकारी–कर्मचारी ग्रामीण, शेतकरी आणि आर्थिकदृष्ट्या सामान्य कुटुंबांतून आलेले असून, स्पर्धा परीक्षेतील संघर्षाची त्यांना पूर्ण जाणीव असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

आयोगातील अधिकारी–कर्मचाऱ्यांनी आजवर पारदर्शकता, सचोटी आणि कर्तव्यपरायणता राखून काम करण्याचा प्रयत्न केला असून उमेदवारांच्या हिताचे निर्णय घेण्यास ते नेहमीच आग्रही राहिले आहेत. आयोगाच्या कामकाजातील पारदर्शकता आणि त्यावरील उमेदवारांचा विश्र्वास यामुळे राज्यातील जवळपास सर्व भरती प्रक्रिया आयोगामार्फत राबविण्याची मागणी होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

मात्र, सध्याच्या एका घटनेमुळे आयोगातील सर्व अधिकारी–कर्मचाऱ्यांवर अविश्र्वास दाखविला जात असल्याने ते व्यथित झाले आहेत. अशा घटनांमुळे अधिकारी–कर्मचाऱ्यांचे मानसिक खच्चीकरण होऊन त्याचा परिणाम भरती प्रक्रियेवर होऊ शकतो आणि अंतिमतः त्याचा फटका उमेदवारांनाच बसू शकतो.

त्यामुळे अधिकारी–कर्मचाऱ्यांनी केलेल्या मागण्यांवर शासनाने तातडीने आवश्यक कार्यवाही करून त्यांची सुरक्षितता सुनिश्र्चित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. झालेल्या घटनेचा तीव्र निषेध अशी भूमिका आयोगातील सर्व अधिकारी–कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती !

## संपादकीय...

महाराष्ट्र हा कृषिप्रधान राज्य म्हणून ओळखला जातो. राज्यातील मोठा लोकसंख्या वर्ग शेतीवर अवलंबून आहे. मात्र अनियमित पाऊस आणि हवामानातील बदलांमुळे दुष्काळाची समस्या गंभीर होत आहे. काही भागांत अतिवृष्टी होते, तर काही भागांत पावसाचे प्रमाण अत्यल्प राहते. पावसाचे असमान वितरण हे महाराष्ट्रातील दुष्काळाचे प्रमुख कारण आहे. पावसाळा लांबणे किंवा अल्पकाळात मुसळधार पाऊस पडणे यामुळे पाण्याचे योग्य नियोजन होत नाही. भूजलाचा वाढता उपसा हीदेखील चिंतेची बाब आहे. विहिरी, बोअरवेल आणि तलावांमधील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. याचा सर्वाधिक फटका शेतकरी आणि ग्रामीण जनतेला बसतो. पाण्याअभावी पिकांचे उत्पादन घटते.

अनेक वेळा शेतकऱ्यांना पिके वाचवण्यासाठी मोठा खर्च करावा लागतो. उत्पन्न कमी आणि कर्जाचा भार वाढल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट निर्माण होते. दुष्काळामुळे जनावरांसाठी चारा आणि पाण्याची टंचाई निर्माण होते. पशुधन वाचवण्यासाठी शेतकऱ्यांना मोठी धडपड करावी लागते. ग्रामीण भागातील रोजगाराच्या संधीही कमी होतात. त्यामुळे अनेक कुटुंबांना शहरांकडे स्थलांतर करावे लागते. दुष्काळाचा परिणाम केवळ शेतीपुरता मर्यादित राहत नाही. पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्याने महिलांना दूरवरून पाणी आणावे लागते.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरही त्याचा अप्रत्यक्ष परिणाम होतो. दुष्काळामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेची घडी विस्कटते. त्यामुळे दुष्काळाकडे केवळ नैसर्गिक आपत्ती म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. ही समस्या मानवी नियोजनाशीही संबंधित आहे. पाण्याचा अवाजवी वापर थांबवणे ही काळाची गरज आहे. पारंपरिक जलस्रोतांचे संवर्धन करणे आवश्यक आहे. तलाव, बंधारे, विहिरी आणि नद्या यांचे पुनरुज्जीवन झाले पाहिजे. जलसंधारणाच्या कामांना अधिक व्यापक स्वरूप देण्याची गरज आहे. शेततळी आणि जलसाठे निर्माण केल्यास पावसाचे पाणी अडवता येईल. पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्यावर भर दिला पाहिजे. यामुळे भूजलपातळी वाढण्यास मदत होईल. ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या पद्धतींचा मोठ्या प्रमाणावर वापर केला पाहिजे. कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. ऊसासारख्या अधिक पाणी लागणाऱ्या पिकांच्या लागवडीचे नियोजन गरजेचे आहे. शेतकऱ्यांना हवामानानुसार पीक नियोजनाचे मार्गदर्शन मिळाले पाहिजे. हवामान अंदाजाची अचूक माहिती गावपातळीवर पोहोचली पाहिजे. सरकारने दुष्काळग्रस्त भागांसाठी प्रभावी आणि वेळेवर उपाययोजना कराव्यात. पाणीपुरवठा, चारा आणि रोजगाराच्या योजना तातडीने राबवल्या पाहिजेत. मात्र सरकारी योजनांबरोबरच लोकसहभागही तितकाच महत्त्वाचा आहे.

गावागावांत जलव्यवस्थापन समित्या सक्रिय झाल्या पाहिजेत. पाणी हे अमूल्य नैसर्गिक साधन आहे, याची जाणीव प्रत्येक नागरिकाला झाली पाहिजे. घरगुती पाण्याची नासाडी टाळली पाहिजे.

शहरी भागानेही पाणी बचतीची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. पावसाचे पाणी साठवण्याची व्यवस्था प्रत्येक घरात असणे उपयुक्त ठरेल. नद्यांचे प्रदूषण आणि अतिक्रमण थांबवणेही आवश्यक आहे. जंगलतोड रोखल्यास पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होईल. वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाला प्राधान्य दिले पाहिजे. दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी दीर्घकालीन धोरण आवश्यक आहे. केवळ टँकरने पाणीपुरवठा करणे हा कायमस्वरूपी उपाय नाही. टँकरव्यवस्थेबरोबरच जलस्रोत निर्माण करण्यावर भर दिला पाहिजे. दुष्काळ निवारणासाठी निधीचा पारदर्शक आणि योग्य वापर झाला पाहिजे. जलसंधारणाच्या कामांची गुणवत्ता आणि परिणाम यांची नियमित तपासणी झाली पाहिजे. स्थानिक परिस्थितीनुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र जलव्यवस्थापन आराखडा तयार केला पाहिजे. शेतकऱ्यांना पीकविमा आणि आर्थिक मदत वेळेवर मिळणे आवश्यक आहे.

दुष्काळग्रस्त कुटुंबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. पाण्याच्या प्रश्र्नावर राजकारण करण्याऐवजी सर्वांनी एकत्रित प्रयत्न केले पाहिजेत. लोकसहभागातून अनेक गावांनी जलसंधारणात चांगले परिणाम साधले आहेत. अशा यशस्वी प्रयोगांचा विस्तार राज्यभर करणे गरजेचे आहे. दुष्काळ हा केवळ पावसाच्या कमतरतेचा परिणाम नसून चुकीच्या जलव्यवस्थापनाचाही परिणाम आहे. म्हणूनच आज केलेली पाणीबचत उद्याच्या संकटाला टाळू शकते. ‘पाणी अडवा, पाणी जिरवा’ हा संदेश प्रत्यक्ष कृतीत उतरवला पाहिजे. शासन, प्रशासन, शेतकरी आणि नागरिक यांनी एकत्रितपणे काम केले तर परिस्थितीत बदल घडू शकतो. महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्यासाठी नियोजन, शिस्त आणि लोकसहभाग या तीन गोष्टी अत्यावश्यक आहेत. आजचा प्रत्येक थेंब वाचवला तर उद्याचे भविष्य सुरक्षित करता येईल. दुष्काळावर मात करणे ही केवळ सरकारची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. जलसंपत्तीचे संवर्धन करूनच महाराष्ट्राचा शाश्र्वत विकास साधता येईल. म्हणून दुष्काळाकडे संकट म्हणून न पाहता जलव्यवस्थापन सुधारण्याची संधी म्हणून पाहिले पाहिजे. सामूहिक प्रयत्नांतून महाराष्ट्र निश्र्चितच दुष्काळमुक्त होऊ शकतो.

# महाराष्ट्रासह देशात बाप्पाच्या आगमनाची जय्यत तयारी!

संपूर्ण सृष्टीचे पालनहार देवाधिदेव महादेव भोले शंकर,तर त्यांचे पुत्र गणपती बाप्पा विघ्नहर्ता व ज्ञानदाता सागर आहेत. त्यामुळेच श्रीगणेशांना सर्वच बाबतीत प्रथम स्थान देण्यात आले आहे. गणपती बाप्पा हिंदू धर्मातील आराध्य दैवत मानल्या जाते. कोणतीही पुजा–अर्चना असो सर्वप्रथम श्रीगणेशाची पूजा केली जाते. नंतरच इतर देवतांची पूजा केली जाते.कारण श्रीगणेश म्हणजे बुद्धीचा सागर,शांतीचे प्रतीक व बालगोपालांचे आवडते दैवत.देशात कोणत्याही देवी–देवतांची पुजा असो,परंतु आरतीची सुरूवात गणपतीच्या आरती पासून होत असते.याचाच अर्थ पृथ्वीतलावर गणेश वंदनेला सर्वप्रथम प्राधान्य देण्यात येते.रावणासारख्या महाकाय शक्तीला रोखण्याचे काम सुध्दा श्रीगणेशांनी केले. श्रीगणेशांना अनेक नावांनी संबोधले जाते गौरी पुत्र,अष्टविनायक अशा अनेक नावांनी श्रीगणेशांची पुजाअर्चना केली जाते.गणेशजी देवता आदिदेव असल्याने त्यांचे प्रत्येक युगात वेगवेगळे अवतार पहायला मिळतात.गणेशजीला चार हात असतात हे चारही हात म्हणजे वेगवेगळ्या दिशांमध्ये व्यापकतेचे प्रतिक मानल्या जाते.देवी पार्वती आंघोळीला गेली असता गणपतीला पार्वतीने सांगितले की माझी आंघोळ होत नाही तोपर्यंत घरात कुणालाही प्रवेश द्यायचा नाही.गणपतीने आई पार्वतीला वचन दिले की ठीक आहे.कोणालाही घरात प्रवेश करू देणार नाही. परंतु तेवढ्यात भगवान शंकरजी दारात आले आणि म्हणाले की बेटा हे माझे घर आहे मला घरात जाऊदे.गणेशजीने भगवान शंकरजीना प्रवेश नाकारला व क्रोधित होवून गणपतीचे डोके त्याच्या धडापासून वेगळे केले.हे पाहुण आई विचलित झाली व काही क्षणातच शंकरजीला आपली चूक लक्षात आली आणि आपल्या दैवी शक्तीच्या आधारावर गणपतीच्या धड्यावर गजाचे मस्त ठेवले आणि गणपतीला जिवदान मिळाले.भगवान शंकरजीनी



आपली चुक कबुल करत संपूर्ण ब्रम्हांडात गर्जना केली की पुजेचा पहिला मान गणपतीला दिला जाईल असे गणपतीला वर्दान दिले.म्हणुनच गणपतीची प्रथम पुजा केली जाते.श्रीगणेशजी विवाहित होते त्यांना दोन बायका होत्या एकीचं नाव रिद्धी आणि दुसरीचे नाव सिद्धी होते.यांना दोन मुलं होती शुभ आणि लाभ त्यामुळे प्रथम पुजा गणेशची होते व सोबतच शुभ–लाभ दिसून येते.यात आपल्याला सर्वत्र शुभ संकेत दिसून येतात.आपल्याला अनेक पुराणांमध्ये गणपतीचे अनेक नावे पहायला मिळतात यात एकदंत, विनायक, लंबोदर,भालचंद्र,गजानन इत्यादी विभिन्न नावांनी आपण श्रीगणेशाची आराधना करीत असतो. त्याचप्रमाणे ज्योतिष शास्त्रानुसार श्रीगणेशांना केतू म्हणून ओळखले जाते केतू हा शांत ग्रह असल्याने संपूर्ण सृष्टीत सावलीची भुमिका पार पाडते व राहु ग्रहांच्या विरोधात सदैव ठाम भूमिका बजावीत असते.त्यामुळेच म्हणतात विरोधाशिवाय ज्ञान नसते आणि ज्ञानाशिवाय मुक्ती नसते. त्यामुळे गणपती देवता हिंदू धर्मातील बुद्धीचा अधिष्ठाता, विघ्नांचा नियंत्रक मानला जाणारा देव आहे म्हणूनच श्रीगणेशाला आपण विघ्नहर्ता म्हणतो.भारत अनेक धर्मांनी, जाती–पंथाने विनलेला देश आहे.त्यामुळे प्रत्येक धर्म आपापल्या पद्धतीने आपापल्या संस्कृती प्रमाणे सण साजरे करतांना दिसतात.भारतात प्रत्येक दिवसाला आगळेवेगळे महत्त्व असून वेगवेगळ्या देवी–देवतांची महत्त्व आहे त्यापध्दतीने पुजा–अर्चना केली जाते.प्रत्येक गणेश चतुर्थीला गणेशाची आराधना करून भक्तगण आपली मनोकामना पूर्ण करण्याचा सर्वच प्रयत्न करतात.परंतु भाद्रपद महिन्यातील शुद्ध चतुर्थी म्हणजे गणेशोत्सव.गणेशमुर्तीची स्थापना करून गणेशोत्सव तब्बल १० दिवस चालतो.या कालावधीत महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात आपल्याला रोषणाईची झगमगाट दिसून येते.यापध्दतीने गणेशोत्सवाचा आनंद संपूर्ण लोक मोठ्या उत्साहाने व गुना गोविंदाने साजरा करतात.लोक गणेशोत्सवात इतके तल्लीन होऊन जातात की १० दिवस कसे गेले हे कोणालाच कळत नाही.गणपती बाप्पा पुन्हा लवकर यावा यासाठी गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर याघोषणांचा गजर करत गणपती बाप्पाला निरोप दिला जातो.इंग्रजांना शह देण्यासाठीच लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरूवात केली. गणेशोत्सवाच्या निमित्ताने जनजागृती करून इंग्रजां विरूद्ध मोठा लढा उभारला व आक्रमक पवित्रा निर्माण केला.त्यामुळे गणेशोत्सव हा सण स्वतंत्र लढ्यासाठी सूध्दा कारगर सिध्द झाला. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाची लावलेली परंपरा आजही संपूर्ण महाराष्ट्रासह भारतात दिसुन येते. त्यामुळेच महाराष्ट्रात गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.पुराणानुसार परशुराम एकवीस वेळा पृथ्वी नि:क्षत्रिय करून कैलासी आले असता दरबार रक्षक गणेशाने त्यास अडवले व दोघांमध्ये घनघोर युद्ध झाले.यात परशुरामाच्या परशुमुळे गणेशाचा एक दात तुटला त्यामुळे श्रीगणेशांना एकदंत सूध्दा म्हणतात असे पुराणामध्ये नमुद आहे.गणेशाला पुजेचे स्थान प्रथम असल्याने आपण पाहतो प्रत्येक मंदिरात आपल्याला गणेशाची मूर्ती दिसुन येते ते मग कोणतेही मंदिर असो. गणेशाचे मुख्य वाहन मुशकराज (उंदीर) त्यामुळे श्रीगणेशा सोबतच उंदराची सूध्दा पुजा–अर्चना केली जाते.पुजेमध्ये मुख्यत्वेकरून दुर्वा, बेल–फुल,शम्मीपत्र,शेंदूर यांचा मुख्यत्वे करून वापर होतो. भारतात श्रीगणेशांची अनेक मोठ–मोठी नामांकित मंदिरे आहेत. त्याचबरोबर नेपाळमध्ये आपल्याला गणेशाची असंख्य मंदिरे पहायला मिळतात.कारण श्रीगणेश हे विघ्नहर्ता आहेत त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक घरामध्ये मुख्य दारावर गणपतीची फोटो आपल्याला दिसुन येते.मानवजातीला द्वेी–देवतांनी पृथ्वीची रक्षा करण्यासाठी पृथ्वीतलावर जन्म दिला.परंतु मानवजातीने या धरतीमातेचा दुरूपयोग केल्यामुळे पृथ्वीतलावरील निसर्गाचा दिवसेंदिवस ह्यास होत आहे.याला वाचविण्यासाठी गणेशोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात १० दिवस वृक्ष लागवडीची मोहीम सरकार मार्फत,प्रशासना मार्फत, शाळा–महाविद्यालय, सामाजिक संस्थांमार्फत व संपूर्ण गणेश मंडळांच्या मार्फत वृक्षारोपण व्हायला पाहिजे.यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल व येणारे महाप्रलय रोखण्यास मोठी मदत होईल, पृथ्वीचे संतुलन राखण्यास मोठी मदत होईल व सर्वत्र हिरवागार गालिचा पसरलेला दिसुन येईल.यातही आपल्याला गणेशोत्सवाचा आनंद अवश्य दिसून येईल.गणपती बाप्पा मोरया!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# विद्यार्थ्यांना अपेक्षित शिक्षण व्यवस्था’ वक्तृत्व स्पर्धेत कल्पना कांबळेचे यश

लातूर: स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि दयानंद कला महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन व विद्यापीठाच्या वर्धापन दिन सप्ताहानिमित्त दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूरची विद्यार्थिनी कु. कल्पना कांबळे हिने तृतीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले.



दयानंद कला महाविद्यालयात ‘विद्यार्थ्यांना अपेक्षित शिक्षण व्यवस्था’ या विषयावर आयोजित स्पर्धेत जिल्ह्यातील विविध पाच महाविद्यालयांतील १३ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी वर्तमान शिक्षण व्यवस्थेतील आवश्यक सुधारणा, बदलत्या काळातील विद्यार्थ्यांच्या अपेक्षा, कौशल्याधिष्ठित व रोजगाराभिमुख शिक्षणाची गरज, डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर तसेच आधुनिक शिक्षणपद्धतींचे महत्त्व यावर अभ्यासपूर्ण व चिकित्सक विचार मांडले.

कल्पना कांबळे हिने विषयाची सुसंगत मांडणी, प्रभावी वक्तृत्व, आत्मविश्र्वासपूर्ण सादरीकरण आणि समर्पक उदाहरणांच्या माध्यमातून परीक्षकांचे लक्ष वेधून घेत तृतीय क्रमांकावर आपले नाव कोरले. तिच्या या यशामुळे दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या शैक्षणिक व सहशैक्षणिक गुणवत्तेत आणखी भर पडली आहे.

या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष ललितकुमार शाह, रमेशकुमार राठी व मकरंद सावे, सचिव रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव श्रीकांतजी उटगे व अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष संजयजी बोरा तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.

दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. गोपालजी लोहिया, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही कल्पना कांबळेचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# रोटरी क्लब ऑफ लातूर मेट्रोच्या वतीने गोंद्रीत २५१ वृक्षांचे रोपण; विद्यार्थ्यांना संगोपनाची जबाबदारी

लातूर (प्रतिनिधी): पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत रोटरी क्लब ऑफ लातूर मेट्रोच्यावतीने नरसिंह विद्यालय, गोंद्री, ता. औसा, जि. लातूर येथे चौथ्या वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. यावेळी एकूण २५१ विविध प्रजातींच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले.



या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ वृक्षारोपण न करता वृक्ष संवर्धनावर भर देण्यात आला. शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला एक वृक्ष दत्तक दिला असून, त्याची वर्षभर काळजी घेण्याची जबाबदारी त्या विद्यार्थ्यावर सोपवण्यात आली आहे. याची नोंद शाळेचे मुख्याध्यापक स्वतः ठेवणार आहेत. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक भावना निर्माण व्हावी यासाठी रोटरी क्लब ऑफ लातूर मेट्रो (२०२७–२८) चे अध्यक्ष रो. धनराज बिरादार यांनी बक्षिसांची घोषणा केली. वर्षभरात ज्या विद्यार्थ्याने आपल्या वृक्षाची उत्तम वाढ करून दाखवली त्याला प्रथम पारितोषिक १००१ रुपये, द्वितीय ७५१ रुपये, तृतीय ५०१ रुपये तर दहा विद्यार्थ्यांना प्रत्येकी १०१ रुपयांचे प्रोत्साहनपर पारितोषिक देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ लातूर मेट्रोचे १५ सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमास पर्यावरण प्रेमी सुपर्ण जगताप यांची विशेष उपस्थिती होती. या उपक्रमासाठी गोविंद काळे व पवन काळे यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे सचिव कदम सर, मुख्याध्यापक शिंदे सर, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला. प्रोजेक्ट चेअरमन रो. हरिश्र्चंद्र पाटील आणि रो. विष्णू कोल्हे यांनी सर्वांचे आभार मानले. हा संपूर्ण उपक्रम रोटरी क्लब ऑफ लातूर मेट्रोचे अध्यक्ष रो. विजय कोळी, सचिव रो. मनोज सूर्यवंशी आणि सहसचिव रो. दत्ता बेडगे यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. कार्यक्रमाची सांगता स्नेहभोजनाने (वनभोजन) करण्यात आली.

# लातूर जिल्ह्यात कुणबी जात प्रमाणपत्र वितरणासाठी आयोजित विशेष शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद; दोन दिवसांत १४२ अर्ज दाखल

लातूर, : जिल्ह्यातील पात्र नागरिकांना कुणबी जात प्रमाणपत्र मिळणे अधिक सुलभ व जलद व्हावे, या उद्देशाने लातूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने १० ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील प्रत्येक महसूल मंडळ स्तरावर संबंधित तलाठी, ग्रामसेवक आणि मंडळ अधिकारी यांच्या संयुक्त पथकांद्वारे विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

या मोहिमेच्या पहिल्या दोन दिवसांत, म्हणजेच १० आणि ११ सप्टेंबर २०२६ रोजी संपूर्ण जिल्ह्यात एकूण २१ विशेष शिबिरांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरांमध्ये नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकूण १४२ अर्ज प्राप्त झाले आहेत, अशी माहिती या अभियानाच्या जिल्हास्तरीय नोडल अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ यांनी केले आहे.

तालुकानिहाय आकडेवारीनुसार, लातूर तालुक्यात ६ शिबिरांच्या माध्यमातून सर्वाधिक ११८ अर्ज प्राप्त झाले आहेत. रेणापूर तालुक्यात २ शिबिरांमध्ये १४ अर्ज प्राप्त झाले, निलंगा तालुक्यात ४ शिबिरांमध्ये ५ अर्ज प्राप्त झाले आहेत. तसेच जळकोट तालुक्यात १ शिबिर आयोजित करून ५ अर्ज प्राप्त झाले आहेत. या मोहिमेदरम्यान एकही अर्ज नाकारण्यात आलेला नाही. १७ सप्टेंबर २०२६ पर्यंत चालणाऱ्या या विशेष मोहिमेचा जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन या अभियानाच्या जिल्हास्तरीय नोडल अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ यांनी केले आहे.

या शिबिरांमध्ये जुन्या कुणबी नोंदी शोधणे, नागरिकांनी सादर केलेल्या पुराव्यांची प्रत्यक्ष पडताळणी करणे, नवीन अर्ज स्वीकारणे, आवश्यक कागदपत्रांची जुळवाजुळव करणे आणि परिपूर्ण अर्ज भरण्यासाठी नागरिकांना मार्गदर्शन व मदत करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. पात्र लाभार्थ्यांना अत्यंत जलद गतीने प्रमाणपत्र वितरीत व्हावे यासाठी प्रशासनाकडून आवश्यक पाठपुरावा करण्यात येत आहे.

विशेष शिबिरांचे पुढील तीन दिवसांचे वेळापत्रक

## केशरबाई शाळेत पर्यावरणपूरक गणेश मूर्ती कार्यशाळा संपन्न.. शिक्षक विद्यार्थी पालकांचा एकत्रित सहभाग..

लातूर: श्री मारवाडी राजस्थान



शिक्षण संस्था द्वारा संचलित सौ. केशरबाई भार्गव प्रा. वि. येथे पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळा संपन्न झाली. यात अनेक विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत निसर्ग व पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

बालकांना गणेश मूर्तीचे विशेष आकर्षण असते. या मुर्त्या कशा बनवाव्यात हे बालकांना उमगावे व स्वनिर्मिती, सर्जनशीलता या गुणांचा विकास व्हावा सोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश मिळावा या प्रमुख उद्देशाने वरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यात शिक्षक, विद्यार्थी व पालकांनी बॉम्बेमाती, लाकडी भुसा, माती व पाणी यांच्यापासून रेखीव व आकर्षक गणेश मुर्त्या स्वहाताने तयार केल्या व त्यास नैसर्गिक रंग देऊन आकर्षक रित्या सजविल्या. सहभागी पालकांनी शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक करून सहभागाबाबत आनंद व्यक्त केला.

शालेय समिती अध्यक्ष श्री. कमलकिशोरजी अग्रवाल यांच्या संकल्पनेतून व मुख्याध्यापक भीमराव दुनगावे यांच्या सहकार्यातून सदरील कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी व्हसाळे श्रद्धा, प्रेमला सोमवंशी, उज्वला बिडवे यांनी परिश्रम घेतले.

## महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री ना.सुनेत्राताई पवार यांचे माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकरांकडून स्वागत

लातूर, : भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी मुंबई दौर्यावर असताना महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी माजी आ. कव्हेकर यांनी पुष्पगुच्छ देऊन उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांचे मनःपूर्वक स्वागत केले.

या सदिच्छा भेटीदरम्यान माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर आणि उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्यामध्ये लातूर जिल्ह्यासह राज्यातील विविध महत्त्वपूर्ण प्रश्नांवर सविस्तर व प्रदीर्घ चर्चा झाली. विशेषतः मराठवाड्यात व लातूर जिल्ह्यात निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती, शेतकर्यांसमोरील अडचणी, पावसाअभावी निर्माण झालेली गंभीर परिस्थिती तसेच शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना आवश्यक ती मदत मिळण्याच्या दृष्टीने शासनस्तरावर करण्यात येणार्या उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांना माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी लातूर येथे प्रस्तावित असलेल्या विभागीय क्रीडा संकुलाच्या उभारणीसंदर्भातही व प्रशासकीय कार्यालय तसेच इतर वास्तूच्या भूमिपूजन समारोहासाठी निमंत्रण दिले. त्याचा स्वीकार ना.सुनेत्राताई पवार यांनी केल्याचे माजी आ.कव्हेकर यांनी सांगितले. यावेळी लातूर आणि परिसरातील उदयोन्मुख खेळाडूंना आधुनिक व दर्जे दार क्रीडा सुविधा उपलब्ध व्हाव्यात, तसेच मराठवाड्यातील क्रीडा क्षेत्राच्या विकासाला अधिक गती मिळावी, या दृष्टीने विभागीय क्रीडा संकुलाची उभारणी महत्त्वपूर्ण असल्याचे सांगून सदरील क्रीडा संकुलाचे काम गतीने करण्यात यावे, अशा सुचनाही त्यांनी यावेळी बोलताना दिल्या.

उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार या सामाजिक, औद्योगिक आणि पर्यावरणविषयक क्षेत्रातही कार्यरत असून, राज्याच्या प्रशासनात महत्त्वपूर्ण जबाबदारी सांभाळत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली राज्याच्या विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्र्वासही या भेटीदरम्यान व्यक्त करण्यात आला. माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर यांची ही सदिच्छा भेट अत्यंत आपुलकीच्या व सकारात्मक वातावरणात पार पडली. लातूर जिल्ह्याच्या विकासाशी संबंधित प्रश्नांसह शेतकरी, युवक आणि क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध विषयांवर झालेल्या चर्चेमुळे या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

# सिंधुदुर्ग विकासाच्या नव्या वळणावर.

सिंधुदुर्गच्या निसर्गसौंदर्याचे संवर्धन करत आर्थिक समृद्धी साधण्याच्या उद्देशाने पुढील २५ ते ३० वर्षांचा भविष्यवेधी विकास आराखडा पालकमंत्री नितेश राणे यांच्या संकल्पनेतून साकारला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक प्रकल्पांना चालना देतानाच व्हीव्हीआयपी पर्यटकांना आकर्षित करणारी 'ताज'सारखी पंचतारांकित हॉटेल्स आणि नवीन पर्यटनस्थळे विकसित केली जात आहेत. राज्यातील पहिला पर्यटन जिल्हा म्हणून ओळख असलेल्या सिंधुदुर्गाला आता पर्यटनाच्या दृष्टीने अधिक विकसित आणि सक्षम करण्याच्या दिशेने नियोजनबद्ध प्रयत्न सुरू आहेत. विकासाच्या नव्या वळणावरील सिंधुदुर्गच्या प्रगतीचा हा आढावा.




जहाजबांधणी उद्योगाच्या माध्यमातून स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच जलवाहतूक, चिपी विमानतळ आणि दर्जेदार रस्त्यांच्या जाळ्याद्वारे दळणवळणाचा विस्तार केला जात आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून वातावरणातील बदलांपासून हापूस आंबा, काजू आणि कोकम पिकांचे संरक्षण करण्यासाठी उपाययोजना सुरू आहेत. जहाजबांधणीसारखे पर्यावरणपूरक उद्योग सिंधुदुर्गात आणण्यासोबतच आधुनिक मत्स्यव्यवसाय, स्थानिक कला व संस्कृतीच्या विकासासाठी कलाकारांना आवश्यक सोयी–सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. स्थानिक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यावरही भर आहे. सक्षम आरोग्य सुविधा, कौशल्य विकास, शून्य कचरा व सांडपाणी व्यवस्थापन, पूर व दरड प्रतिबंधक उपाययोजना तसेच प्रशासनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर यांना प्राधान्य देण्यात येत आहे. पर्यावरणाचा समतोल, पर्यटन, शेती–मत्स्यव्यवसाय, रोजगार आणि गतिमान पायाभूत सुविधा या पंचसूत्रीच्या माध्यमातून सिंधुदुर्गला शाश्र्वत आर्थिक विकासाच्या दिशेने नेण्याचा सुरू आहे.

निसर्गाचे मुक्त वरदान लाभलेला, अथांग अरबी समुद्रकिनारा आणि हिरवागार सह्याद्री यांची समृद्ध देणगी लाभलेला सिंधुदुर्ग जिल्हा आज शाश्र्वत प्रगतीच्या एका ऐतिहासिक वळणावर उभा आहे. निसर्गसौंदर्य जपत असताना जिल्ह्याला आर्थिक सुबत्तेकडे कसे नेता येईल, हा प्रश्र्न कोकणाच्या संदर्भात नेहमीच कळीचा राहिला आहे. पर्यावरण संवर्धन आणि आर्थिक उन्नती या दोन्ही गोष्टींचा समांतर समतोल साधत जिल्हा प्रशासन अत्यंत नियोजनबद्धरीतीने या ध्येयाकडे वाटचाल करत आहे. उद्देश एकच पर्यावरणपूरक विकास आणि रिव्हर्स मायग्रेशन.

पर्यावरण आणि विकासाचा समांतर समतोल

विकास आराखडा तयार करताना पर्यावरण आणि प्रगती हे एकमेकांशी विसंगत नसून परस्परपूरक आहेत, हे तत्त्व केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. मालदीवसारख्या आंतरराष्ट्रीय पर्यटन क्षेत्राचे उदाहरण घेतल्यास, तिथे समुद्रात भव्य वॉटर व्हिला उभारूनही तिथल्या सागरी परिसंस्थेला धक्का पोहोचू दिला गेला नाही. योग्य मार्ग आणि नियोजनबद्ध उपाययोजनांमुळे हे शक्य झाले. त्याच धर्तीवर सिंधुदुर्गातही निसर्गाचे मूळ सौंदर्य अबाधित ठेवून विकासकामे पुढे नेली जात आहेत. केवळ पारंपरिक पद्धतींवर अवलंबून न राहता प्रशासकीय पातळीवर पर्यावरणपूरक, प्रयोगशील आणि धाडसी धोरणात्मक निर्णय घेण्यावर भर दिला जात आहे.

उच्च खर्च क्षमतेचे पर्यटन आणि दरडोई उत्पन्न वाढ

जिल्ह्याची अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी दरडोई उत्पन्नातील तफावत भरून काढणे अनिवार्य आहे. शेजारील गोव्याचे दरडोई उत्पन्न सुमारे साडेचार ते पाच लाख रुपयांच्या घरात पोहोचले असताना सिंधुदुर्ग अजूनही दोन ते सव्वादोन लाखांच्या आसपास आहे. हे अंतर कमी करण्यासाठी केवळ बजेट पर्यटनावर मर्यादित न राहता उच्च खर्च क्षमता असणाऱ्या पर्यटकांना आकर्षित करण्याचे धोरण आखण्यात आले आहे.

यासाठी जिल्ह्यात 'ताज','हयात' सारख्या जागतिक ख्यातीच्या पंचतारांकित हॉटेल ब्रँड्सचे जाळे विणले जात आहे. सोबतच 'डिझनीलँड' व 'युनिव्हर्सल स्टुडिओ' सारख्या भव्य मनोरंजन प्रकल्पांच्या संकल्पनांवर काम सुरू आहे. पर्यटक जिल्ह्यात केवळ एक–दोन दिवस थांबून गोव्याकडे निघून जाऊ नयेत, तर त्यांनी येथे किमान तीन ते चार दिवस मुक्काम करावा, यादृष्टीने सुमारे २५ नवीन पर्यटन स्पॉट्स विकसित करण्यात येत आहेत. यामुळे स्थानिक हॉटेल व्यावसायिक, टॅक्सी चालक, गाईड्स आणि गृहउद्योगांच्या उत्पन्नात मोठी वाढ होईल.

जहाज बांधणी उद्योग आणि स्थानिक तरुणांचे स्थलांतर रोखणे

जिल्ह्यातील सर्वाधिक संवेदनशील आव्हान म्हणजे हुशार आणि उच्चशिक्षित मनुष्यबळाचे होणारे स्थलांतर. दहावी–बारावीत १०० टक्के निकाल देणारी स्थानिक गुणवत्ता केवळ रोजगाराच्या शोधात मुंबई, पुणे अथवा गोव्यात जाते. ही बौद्धिक संपत्ती जिल्ह्यातच स्थिरावली पाहिजे, यासाठी मोठ्या पर्यावरणपूरक उद्योगांना निमंत्रित केले जात आहे. आता रिव्हर्स मायग्रेशन जिल्ह्यात सुरु व्हायला सुरुवात झाली आहे.

गोव्यात नव्याने उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलांच्या उंचीच्या मर्यादेमुळे तेथील ३० मीटर उंचीची जहाजे बांधणाऱ्या 'शिप बिल्डिंग इंडस्ट्री'ला जागेची व संचलनाची अडचण निर्माण झाली आहे. भारतातील एकूण जहाजांपैकी सुमारे ४० टक्के जहाजे गोव्यात तयार होतात. हा उद्योग थेट ६ ते ७ हजार आणि अप्रत्यक्षरीत्या १० हजारांहून अधिक रोजगार देणारा आहे. गोव्यातील या अडचणीचे रूपांतर सिंधुदुर्गासाठी संधीत करण्यासाठी गोवा शिपयार्ड व गोवा शिपिंग असोसिएशनशी चर्चा सुरू आहे. या उद्योगाचा विस्तार जिल्ह्यात झाल्यास हजारो स्थानिक तरुणांना स्वतःच्याच मातीत दर्जेदार तांत्रिक व प्रशासकीय रोजगार उपलब्ध होईल.

गतिमान दळणवळण : जल, हवाई आणि रस्ते क्रांती

पर्यटन आणि उद्योगांच्या विस्ताराला खरी गती देण्यासाठी आधुनिक, बहुआयामी दळणवळण यंत्रणा उभारण्यावर जिल्हा प्रशासनाने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. जलवाहतुकीच्या क्षेत्रात क्रांती घडवताना चिपी विमानतळाजवळील कर्ली ते तारकर्ली दरम्यान सागरी जलमार्ग सुरू करण्याचे नियोजन असून, सध्या रस्तेमार्गे १ तास २० मिनिटे लागणारे हे अंतर या जलमार्गामुळे अवघ्या ११ मिनिटांत पूर्ण होणार आहे. हवाई वाहतुकीला बळकटी देण्यासाठी चिपी विमानतळ २४ तास कार्यान्वित ठेवण्याचे प्रयत्न सुरू असून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून थेट विमानफेऱ्या सुरू होत आहेत. रेल्वे प्रवाशांसाठी नव्या गाड्या आणि नियमित फेऱ्या वाढवण्यावर भर दिला जात आहे. शेजारील मोपा आंतरराष्ट्रीय विमानतळ जिल्ह्याच्या सीमेवर असल्याने सिंधुदुर्ग हे गोव्याचे नैसर्गिक विस्तार क्षेत्र ठरत असून, तिथे उतरणाऱ्या पर्यटकांना जिल्ह्यात वळवण्यासाठी सर्व पायाभूत सुविधा सज्ज ठेवल्या जात आहेत. यासोबतच जिल्ह्यातील दुर्गम भागांतही पर्यटक आणि नागरिकांना अखंड डिजिटल संपर्क मिळावा म्हणून बीएसएनएल आणि जिओच्या सहकार्याने दूरसंचार जाळे अधिक सक्षम केले जात आहे.

कृषी मूल्यवर्धन, सागरी अर्थव्यवस्था आणि स्थानिक संस्कृती

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात स्थानिक शेतकरी, बागायतदार आणि मच्छीमार केंद्रस्थानी आहेत. कोकणाचा राजा असलेला जगप्रसिद्ध हापूस आंबा, काजू आणि कोकम यांसारख्या स्थानिक फलोत्पादनांवर जिल्ह्यातच प्रक्रिया करणारे ॲग्रो–प्रोसेसिंग युनिट्स उभारण्यात येत आहेत, ज्यामुळे थेट शेतकऱ्यांच्या नफ्यात वाढ होईल.

सागरी अर्थव्यवस्थेला चालना देताना पारंपरिक मच्छीमारांचे हक्क अबाधित ठेवून आधुनिक शीतगृहे, मासळी प्रक्रिया आणि थेट निर्यातीसाठी कार्गो साखळी निर्माण केली जात आहे. सावंतवाडीची ऐतिहासिक लाकडी खेळणी, तांब्या–पितळेची कलाकुसर आणि मालवणी खाद्यसंस्कृतीला पंचतारांकित हॉटेल्सशी जोडून महिला बचत गटांना हक्काची बाजारपेठ मिळवून दिली जात आहे. सोबतच छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सारख्या सर्वच जलदुर्गांचे जतन आणि दशावतारासारख्या पारंपरिक लोककलांना पर्यटनाशी जोडून सांस्कृतिक वारसा जपला जात आहे.

आरोग्य, आधुनिक तंत्रज्ञान आणि आपत्ती व्यवस्थापन

शाश्र्वत प्रगतीसाठी नागरिकांचे जीवनमान सुरक्षित आणि समृद्ध असणे गरजेचे आहे. उपचारांसाठी शेजारील जिल्हा किंवा राज्यांवर अवलंबून राहावे लागू नये म्हणून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि मल्टिस्पेशालिटी आरोग्य सुविधा जिल्ह्यात सक्षम केल्या जात आहेत. उद्योग व हॉस्पिटॅलिटी क्षेत्राच्या गरजेनुसार स्थानिक तरुणांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रे सुरू केली जात आहेत. वाढत्या पर्यटनामुळे निसर्गाची हानी होऊ नये म्हणून शून्य कचरा, आधुनिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा आणि सौरऊर्जेचा वापर अनिवार्य केला जात आहे.

पावसाळ्यातील अतिवृष्टी आणि पुराचा फटका बसू नये म्हणून नद्यांमधील गाळ उपसण्याचा पद्धतशीर कार्यक्रम हाती घेण्यात आला असून, यामुळे पुराची ६० ते ७० टक्के समस्या मार्गी लागत आहे. घाट रस्त्यांवर दरडी कोसळू नयेत म्हणून आधुनिक संरक्षक जाळ्या बसवून सुरक्षितता वाढवण्यात आली आहे. प्रशासनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा सर्वाधिक वापर करून ई–प्रशासनाच्या माध्यमातून पारदर्शक आणि जलद निर्णयप्रक्रिया राबवणारा जिल्हा म्हणून सिंधुदुर्ग पथदर्शी ठरत आहे.

पर्यावरणाचा समतोल, उच्च दर्जाचे पर्यटन, स्थानिक शेती–मत्स्यव्यवसायाचे सक्षमीकरण, पर्यावरणपूरक रोजगार आणि गतिमान पायाभूत सुविधा या पंचसूत्रीवर सिंधुदुर्गाचा पुढील २५ वर्षांचा विकास आराखडा साकारला जात आहे. निसर्गाचे पावित्र्य जपत आर्थिक संपन्नतेकडे टाकलेले हे पाऊल सिंधुदुर्ग जिल्ह्याला विकासाच्या राष्ट्रीय नकाशावर अग्रस्थानी नेणारे नक्कीच ठरेल.

०००

संकलन – जिल्हा माहिती कार्यालय, सिंधुदुर्ग

## बेसा - पिपळाच्या पाणीपुरवठ्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करा -पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

नागपूर, : बेसा–पिपळा नगरपंचायत क्षेत्रातील



पाणीपुरवठ्यातील अनियमितता टाळण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करून येथील नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा करण्याचे निर्देश जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिले.

बेसा–पिपळा नगरपंचायत पाणीपुरवठा योजनेचा आज सविस्तर आढावा त्यांनी घेतला, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस बेसा – पिपळाच्या नगराध्यक्षा कीर्ती बडोले, उपाध्यक्ष नरेश भोयर यांच्यासह जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, उपविभागीय अधिकारी वंदना सौरंगपते, भूमि अभिलेखचे जिल्हा अधीक्षक श्री. मोहिते, मुख्याधिकारी भारत नंदनवार आदी उपस्थित होते.

पालकमंत्री म्हणाले, जलशुद्धीकरण केंद्रातून दूषित पाणीपुरवठा होऊ नये यासाठी पाणी सोडताना सतर्कता बाळगावी, बांधकामासाठी लागणाऱ्या पाण्याच्या अनधिकृत जोडण्या शोधून त्या तात्काळ खंडित कराव्यात व जलस्रोतापासून पाणी वाहून आणताना त्यात होणारा पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी उपाययोजना करावी.

या भागात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाणीपुरवठा करण्यात येतो. परंतु, येथील काही भागात नियमित पाणीपुरवठा होत नसून योग्य नियोजनातूनच कायमस्वरूपी उपाययोजना करता येणे शक्य असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले. यासाठी जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, एनएमआरडीए व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी समन्वयातून कार्यवाही करावी. नागरिकांना सुरक्षित, शुद्ध आणि पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने जलशुद्धीकरण केंद्रातील त्रुटी दूर करून मानकांनुसार नियमित शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यासह पाणीगळतीमुळे होणारा पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी तातडीने कृती आराखडा तयार करावा व त्याबाबतचा अहवाल मुदतीत सादर करण्याचे आदेश त्यांनी नगरपंचायत प्रशासनाला यावेळी दिले.

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मौजा पिपळा, घोगली, बेसा व बेलतरोडी येथील पट्टे वाटप तात्काळ पूर्ण करावे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत नागरिकांसाठी पाणीपुरवठा, स्वच्छता, दिवाबत्ती, अशा मूलभूत सुविधांची निर्मिती करण्यात यावी. आयुष्मान कार्ड वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

## 'जय महाराष्ट्र', 'दिलखुलास'मध्ये मंत्री मंगल प्रभात लोढा यांची विशेष मुलाखत

मुंबई, : राज्यातील युवक आणि युवतींना त्यांच्या शैक्षणिक




पात्रता, कौशल्य आणि आवडीनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच स्वयंरोजगार व उद्योजकतेला चालना देण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभ महाराष्ट्र' या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचे राज्यात २९ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून युवक, उद्योग आणि रोजगाराच्या संधी यांना एकाच व्यासपीठावर आणण्याच्या शासनाच्या प्रयत्नांबाबत कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी 'जय महाराष्ट्र' आणि 'दिलखुलास' या कार्यक्रमांतून विशेष संवाद साधला आहे.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमातून ही विशेष मुलाखत मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री ८ वाजता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणार आहे. तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिकृत समाजमाध्यमांवरही ही मुलाखत उपलब्ध होणार आहे. तसेच 'दिलखुलास' कार्यक्रमातून दि. १६ व १७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवर तसेच 'छ्ध्री जप –खठ' मोबाईल पवर या मुलाखतीचे प्रसारण करण्यात येणार आहे. या विशेष मुलाखतीचे निवेदन डॉ. मृण्मयी भजक यांनी केले आहे.

राज्यातील युवांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, उद्योगांना आवश्यक कुशल मनुष्यबळ मिळवून देणे तसेच युवकांना स्वयंरोजगार आणि उद्योजकतेसाठी प्रोत्साहन देणे, हा या रोजगार मेळाव्याचा प्रमुख उद्देश आहे. येत्या दि.२९ सप्टेंबर २०२६ रोजी राज्यभर एकाच वेळी रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येणार असून, या माध्यमातून युवकांना विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या संधी, उद्योगांना आवश्यक मनुष्यबळ आणि कौशल्याधारित रोजगाराच्या नव्या शक्यता उपलब्ध होणार आहेत.

या विशेष मुलाखतीत मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभ महाराष्ट्रची संकल्पना, त्याचे नियोजन, युवकांसाठी उपलब्ध होणाऱ्या रोजगाराच्या संधी, उद्योगांच्या गरजेनुसार कौशल्यविकास, स्वयंरोजगार व उद्योजकतेला प्रोत्साहन आणि राज्यातील भविष्यातील रोजगारनिर्मितीची दिशा याबाबत सविस्तर माहिती दिली आहे. युवक व युवतींनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन उपलब्ध संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# लोकअदालतीच्या माध्यमातून मालमत्ता कर थकबाकीदाराकडून ५ कोटी रुपयाची वसुली

लातूर /प्रतिनिधी : लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने मालमत्ता कर थकबाकीदारांसाठी शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी महानगरपालिका मुख्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय लोकअदालत मध्ये नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यातून सुमारे १५०० मालमत्ता कर थकबाकीदारांकडून तब्बल ५ कोटी रुपयांचा मालमत्ता कर वसूल करण्यात आला.




लातूर शहर महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाच्या वतीने मालमत्ता कर थकबाकीदारांना कर भरण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नागरिकांनी या संधीचा लाभ घेत आपली मालमत्ताकराची थकबाकी भरून महानगरपालिकेस सहकार्य केले.या लोकअदालत करिता जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या पॅनेलवरील सेवानिवृत्त न्यायाधीश मा.श्री.ए.पी.कुरेशी यांची उपस्थिती लाभली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांना मालमत्ता कर थकबाकी प्रकरणांबाबत मार्गदर्शन व आवश्यक सल्ला देण्यात आला.

लोकअदालत कॅम्पला महापौर श्रीमती जयश्री सोनकांबळे, उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, सभागृह नेते विजयकुमार साबदे, गट नेते दिपक मठपती तसेच इतर सन्माननीय नगरसेवकांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी नागरिकांचा सहभाग, करसंकलन विभागाची कार्यपद्धती आणि लोकअदालतीच्या माध्यमातून झालेल्या वसुलीची माहिती घेतली व थकबाकीदारांना प्रोत्साहित केले.

महानगरपालिकेच्या या उपक्रमामुळे मालमत्ता कर थकबाकीदारांना आपली थकबाकी निकाली काढण्याची संधी मिळाली असून, महानगरपालिकेच्या महसूल वसुलीसही मोठी चालना मिळाली आहे. तरी राहिलेल्या थकबाकीदार साठी उद्या १ दिवसाचे सुट योजनेस मुदतवाढ देण्यात येणार आहे. तरी उर्वरित थकबाकीदार यांनी या सुवर्णसंधीच लाभ घेवून आपला थकित मालमत्ता कर भरून लातूर शहराच्या विकासात सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालीकेच्या वतीने करण्यात येते.

# शाळांचा दर्जा अधिक उंचावणे, विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील शिक्षणासाठी सर्वतोपरी मदत – उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

बारामती, : शिक्षण हे सर्वात मोठे शस्त्र असून शिक्षक ही राष्ट्राची खरी संपत्ती आहे. बारामती शहर नेहमीच शैक्षणिक व सामाजिक प्रगतीचे केंद्र राहिले आहे. बारामती तालुक्यातील शाळांचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी व विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरचे शिक्षण देण्यासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिली.



पंचायत समितीच्यावतीने आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळ्यात त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे, उपसभापती विवेक वळसे पाटील, पंचायत समिती सभापती किरण तावरे, उपसभापती शुभांगी आगवणे, नगराध्यक्ष सचिन सातव, उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे, गट विकास अधीकारी किशोर माने,तहसीलदार स्वप्नील रावडे,आरोग्य अधिकारी मनोज खोमणे उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्याची महत्त्वाची जबाबदारी शिक्षकांवर आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान न देता त्यांच्यामध्ये सत्यनिष्ठा, देशप्रेम आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवावा. पुणे जिल्हा ही शिक्षणाची पंढरी आहे. या समृद्ध शैक्षणिक परंपरेत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षक हे समाज आणि राष्ट्राचे खरे शिल्पकार असून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करण्याचे कार्य ते करतात.

बारामती तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान उल्लेखनीय आहे. या शाळांमध्ये शिक्षण घेणारी मुले ही ग्रामीण महाराष्ट्राची खरी ताकद असून त्यांच्या गुणवत्ता आणि क्षमतेला योग्य दिशा देण्याचे काम शिक्षकांनी करावे. महाराष्ट्र ही संत, समाजसुधारक आणि शिक्षणतज्ज्ञांची भूमी आहे. राज्यातील अनेक शिक्षकांनी आपल्या कार्यातून राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर लौकिक मिळवला आहे, असेही त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, राज्य शासनाने शिक्षण आणि शिक्षण क्षेत्राच्या विकासाला नेहमीच अग्रक्रम दिला आहे. बदलत्या काळानुरूप शिक्षकांनी अद्ययावत तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षणासोबतच समस्या निराकरण, टीमवर्क आणि मूल्याधारित शिक्षणाची जोड देत त्यांच्यामध्ये सद्गुणांची रुजवणूक करावी. स्पर्धेच्या युगात आत्मविश्र्वासाने परिस्थितीला सामोरे जाणारी सशक्त पिढी घडविण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे.

ग्रामीण भागातील एकही मूल शिक्षणापासून वंचित राहणार नाही व जिल्हा परिषद शाळेचा दर्जा सुधारण्यासाठी राज्य शासन सातत्यपूर्ण प्रयत्न करत आहे. विद्यार्थ्यांनी वाचन करावे, विचार करावा, प्रश्न विचारावेत, स्वतःचे मत तयार करावे आणि अपयशाची भीती बाळगू नये, असा सल्लाही उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी दिला.

शिक्षणामुळे सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडतो. दिवंगत अजितदादांनी नेहमीच महाराष्ट्राच्या तसेच पुणे जिल्ह्याच्या शैक्षणिक विकासाला प्राधान्य दिले. प्रत्येक जिल्हा परिषद शाळेत अद्ययावत संगणक कक्ष, ई–लर्निंग सुविधा आणि डिजिटल वर्गखोल्या उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षकांना आधुनिक अध्यापन पद्धतींचे प्रशिक्षण देण्यासाठी विशेष निधीची तरतूद करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले.

राज्याच्या शिक्षण क्षेत्रात सकारात्मक आणि गुणात्मक बदल घडविण्याचा शासनाचा निर्धार असून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी मुख्यमंत्री विज्ञानवारी, गुणवंत विद्यार्थ्यांसाठी सायन्स सेंटर, समूह शाळा, आदर्श शाळा, दत्तक शाळा, प्रवेशोत्सव, आरोग्य तपासणी, सैनिकी शिक्षण, मोफत गणवेश, निपुण महाराष्ट्र अभियान यांसारखे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. शिक्षकांचे प्रश्न, शाळांमधील सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी शासन सदैव तत्पर आहे असे सांगून यावर्षी पुणे जिल्हा परिषदेच्या ६०० शाळा मॉडेल स्कूल करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी अन्य मान्यवरांनीही आपले मनोगत व्यक्त केले. बारामती तालुक्यात ६५ जिल्हा परिषद शाळांमध्ये ११ हजार पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. तालुक्यातील आरटीई अंतर्गत शिक्षण घेत असलेले विद्यार्थी, मागील व चालू वर्षातील मॉडेल स्कूलच्या कामांची प्रगती, शिक्षक भरती, मिशन ३०० अंतर्गत शाळांमध्ये करण्यात येणाऱ्या कामांची माहितीही देण्यात आली.

कार्यक्रमाला जिल्हा परिषद,पंचायत समिती सदस्य, आजी– माजी लोकप्रतिनिधी, आदर्श शिक्षक, गुणवंत विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सव काळाची गरज

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि सार्वजनिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचे कार्य केले. महाराष्ट्र शासनाने १४ ऑगस्ट २०२५ रोजी गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव'म्हणून घोषीत केल्यामुळे या उत्सवाचा उत्साह द्विगुणीत झाला आहे. परंतू हा उत्सव साजरा करताना नागरिकांची सुरक्षितता, कायद्याचे पालन, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकी जपणे आवश्यक आहे. आपल्या आनंदामुळे नागरिकांना त्रास होऊ नये, यासाठी भक्तिभाव कायम ठेवून शिस्तबद्ध रीतीने आणि सामाजिक भान जपून पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करणे काळाची गरज आहे.. !




राज्य महोत्सवातून पर्यावरण पूरक गणेशोत्सवाचा संदेश– राज्य शासनाने गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित केल्यानंतर यंदाच्या वर्षी हा उत्सव अधिक व्यापक, नियोजनबद्ध आणि लोकसहभागातून साजरा होण्यासाठी सर्व शासकीय विभाग प्रयत्नशील आहेत. महाराष्ट्राची समृद्ध लोककला, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक वैभव राज्याच्या सीमेपलीकडे पोहोचवण्यासाठी राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने 'लोककलेतील श्री गणेश' आणि 'महा गणेशोत्सव – महाराष्ट्राचा राज्य उत्सव' अंतर्गत देशातील विविध शहरांमध्ये विशेष सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. चेन्नई, सिल्वासा, कोलकाता आणि हैदराबाद मध्ये हे कार्यक्रम होणार आहेत.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने राज्यातील विविध कला, संस्कृती आणि लोकपरंपरांना चालना देणारे कार्यक्रम, शाडूच्या मूर्ती तयार करणाऱ्या कलाकारांना प्रोत्साहन, 'इको–फ्रेंडली गणेश मूर्ती रंगरंगोटी महोत्सव, हातकागद कला संवर्धन, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम, हस्तकला प्रदर्शन, सामाजिक जनजागृती आणि विशेष उपक्रम राबवण्यात येत आहेत.

भव्य महा गणेशमूर्ती कार्यशाळा – प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' मधून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले. हा संदेश व्यापक स्वरुपात पोहोचविण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातर्फे नवी मुंबईत 'पर्यावरणपूरक महा गणेशमूर्ती कार्यशाळा' घेण्यात आली. १० हजारांहून अधिक शालेय विद्यार्थी आणि नागरिकांनी एकाच वेळी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार केल्या.

मातीच्या मूर्तींना प्राधान्य– पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी राज्यभर व्यापक जनजागृतीवर भर देण्यात येत आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शाडू माती किंवा नैसर्गिक मातीच्या गणेशमूर्तींना नागरिकांनी प्राधान्य देणे आवश्यक आहे. मूर्ती विसर्जनासोबत निर्माल्य संकलन, कचरा व्यवस्थापन आणि मंडप परिसराची स्वच्छतेकडेही गांभीर्याने पाहावे लागेल. जलस्रोतांचे संवर्धन – नदी, तलाव आणि अन्य जलस्त्रोतांचे प्रदूषण रोखण्यासाठी प्रशासनाच्या वतीने मूर्ती संकलन व 'मूर्तीदान'उपक्रम राज्यभर राबवण्यात येतो. या उपक्रमाला नागरिकांनी आणि गणेशोत्सव मंडळांनी सहकार्य करायला हवे. घरगुती मूर्तींचे विसर्जन घरच्या घरी किंवा कृत्रिम तलाव, कुंड अशा पर्यायी व्यवस्थेत करणे पर्यावरणाच्या दृष्टीने उपयुक्त आहे. भक्तिभाव कायम ठेवून जलस्त्रोतांचे संरक्षण करण्याचा संदेश या माध्यमातून देता येईल.

डीजेमुक्त उत्सव साजरा करुन संस्कृतीचा गजर करुया– यंदाच्या गणेशोत्सवाच्या पार्श्र्वभूमीवर राज्यातील विविध भागांत डीजे आणि लेझरमुक्त उत्सवासाठी प्रशासनाबरोबरच नागरिकांकडून सकारात्मक भूमिका घेतली जात आहे. मर्यादेपेक्षा अधिक तीव्रतेच्या आवाजामुळे, लहान बालके, गरोदर माता, ज्येष्ठ नागरिक आणि ह्रदयविकाराच्या रुग्णांना धोका पोहचल्याची अनेक उदाहरणे आहेत. आपल्या आनंदामुळे नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी ध्वनी मर्यादेचे पालन करणे गरजेचे आहे. पारंपरिक ढोल–ताशा, लेझीम, झांज पथक, पोवाडे, शिवकालीन कला, लोकनृत्य आणि विविध लोककलांच्या सादरीकरणावर भर दिल्यास लोककला जपल्या जातील. तसेच स्थानिक लोककलाकारांना रोजगाराची संधी मिळवून देण्याचे सत्कार्य घडेल. यामुळे 'तीव्र आवाज टाळूया.. संस्कृतीचा गजर करुया' ही गणेशोत्सवाला ओळख देता येईल.

लेझरमुक्त गणेशोत्सव – अतितीव्र लेझरच्या प्रकाशामुळे अनेकांच्या डोळ्यांना इजा पोहचली आहे, तर काहींना डोळे गमवावे लागले आहेत. त्यामुळे आकर्षक रोषणाई करताना नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार करणे अत्यावश्यक आहे. लेझरचा वापर टाळून सुरक्षित प्रकाशयोजनेला प्राधान्य द्यावे. यंदा डीजेसोबत लेझर लाईटच्या वापराबाबतही प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. उत्सवातील आकर्षण वाढवताना नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होणार नाही, याची दक्षता घेणे प्रत्येक मंडळाची जबाबदारी आहे.

गणेशोत्सवातून सामाजिक संदेशाची प्रभावी मांडणी – गणेशोत्सव मंडळे ही समाजप्रबोधनाची प्रभावी माध्यमे आहेत. शासकीय योजनांची माहिती, रक्तदान, आरोग्य तपासणी, स्वच्छता, वृक्षारोपण, महिला व बालसुरक्षा, व्यसनमुक्ती आणि वाहतूक शिस्त यांसारख्या विषयांवर आधारित संदेश जास्तीत जास्त मंडळांनी देखाव्यांच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहचवावा. 'माझा गणपती – माझी सामाजिक जबाबदारी' हा विचार प्रत्येक मंडळाकडून पोहोचवता येईल.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची लोकचळवळ – राज्यातील महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींच्या माध्यमातून पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी नियोजन आणि जनजागृतीला चालना देण्यात येत आहे. 'एक गाव, एक गणपती'सारख्या विधायक संकल्पनांसोबत घरगुती गणेशमूर्तींसाठी माती, धातू, संगमरवर किंवा अन्य पर्यायी मूर्तींचा विचार, कृत्रिम विसर्जन स्थळांचा वापर, मूर्ती व निर्माल्य संकलन आणि योग्य व्यवस्थापन याबाबत गावपातळीवर प्रबोधन करण्यात येत आहे. आशा, अंगणवाडी सेविका, शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामपंचायत यांचा लोकसहभाग या उपक्रमाला व्यापक स्वरुप देत आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची प्रभावी तयारी – कोल्हापूर जिल्हा परिषदेमार्फत साधारणपणे सन २०१५ पासून पर्यावरणपूरक गणेशोत्सव उपक्रम राबविण्यात येत आहे. नागरिकांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेऊन यंदाही उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील कुटुंबे आणि गणेशोत्सव मंडळांनी मूर्तीदान, निर्माल्य संकलन आणि जलप्रदूषण रोखण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तालुकानिहाय संपर्क अधिकारी नियुक्त करून गटविकास अधिकाऱ्यांच्या समन्वयाने संनियंत्रण व मार्गदर्शन करण्यात येत आहे.

सन २०२५ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यात २ लाख ९१ हजार ३१९ घरगुती तर २ हजार ४१० सार्वजनिक गणेशमुर्ती अशा एकूण २ लाख ९३ हजार ७२९ गणेशमूर्तींचे संकलन करण्यात आले. यासोबतच ३८५ घंटागाड्या आणि १ हजार ३५२ ट्रॉलीद्वारे निर्माल्य संकलन करण्यात आले आहे. यंदाही पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी कोल्हापूरकर सज्ज आहेत.

युवकांनी उत्सवासोबत भविष्याचाही विचार करावा – उत्सवादरम्यान डीजे नियमांचे उल्लघंन, वादविवाद, मारामारी, रस्त्यावरील बेशिस्त वर्तन, वाहतूक नियमांचे उल्लंघन, सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन आणि हुल्लडबाजी, महिलांची छेडछेड, सोशल मिडीयावरील आक्षेपार्ह पोस्ट अशा गैरप्रकारांमुळे गुन्हे दाखल होऊ शकतात. अशा गुन्हयांमध्ये अडकल्यास तरुणांच्या भविष्यावर परिणाम होऊ शकतो. शैक्षणिक अभ्यासक्रमांचे प्रवेश, परदेशी शिक्षण, शासकीय नोकरी किंवा इतर संधींसाठी आवश्यक असलेल्या चारित्र्य पडताळणीच्या प्रक्रियेत या बाबींचा विचार होऊ शकतो. त्यामुळे युवकांनी उत्साहाच्या भरात कायद्याचे उल्लंघन होणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी. 'एक दिवसाचा उत्साह, आयुष्यभराची अडचण होऊ नये, यासाठी विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे.

प्रशासनाला सहकार्य – वाहतूक व्यवस्था, मिरवणुकीचे मार्ग, वेळेचे नियोजन, ध्वनीमर्यादा, अग्निसुरक्षा आणि गर्दीच्या व्यवस्थापनाबाबत प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करणे प्रत्येक मंडळाची जबाबदारी आहे. महिला, बालके आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी स्वयंसेवकांची व्यवस्था, मदत कक्ष आणि आपत्कालीन संपर्क यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. प्रशासन आणि गणेशोत्सव मंडळांमधील समन्वयातून उत्सव अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि आनंददायी होईल.

उत्सव काळात स्वच्छतेला प्राधान्य – गणेश मंडपाचा परिसर, मिरवणुकीचे मार्ग आणि विसर्जनस्थळांवर स्वच्छता राखणे ही गणेश मंडळांची आणि यामध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. उत्सवादरम्यानचे निर्माल्य, प्लॅस्टिकच्या पिशव्या, बाटल्या आणि अन्य कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावून स्वच्छतेचा जागर करणे आवश्यक आहे. बाप्पांच्या आगमनावेळी आणि विसर्जनावेळीही परिसर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प प्रत्येकाने जोपासायला हवा.

महाराष्ट्रासाठी आदर्श गणेशोत्सव घडवूया– लोकसहभागातून साजरा होणाऱ्या महाराष्ट्राच्या गणेशोत्सवाला मोठी सांस्कृतिक परंपरा आहे. या उत्सवाला सामाजिक परिवर्तनाचा विचार लाभला आहे. या परंपरेला पर्यावरण संवर्धन तसेच नागरिकांची सुरक्षितता, सामाजिक बांधिलकीची जोड देण्याची गरज आहे. शासनाच्या वतीने लोककलांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम, मातीच्या गणेश मूर्ती कार्यशाळा, उत्कृष्ट गणेश मंडळ स्पर्धा, सजावट स्पर्धा व अन्य उपक्रमांच्या माध्यमांतून पर्यावरण पूरक गणेशोत्सवावर भर देण्यात येत आहे. तसेच प्रदूषणमुक्त परिसर, स्वच्छता, सामाजिक कार्य आणि विधायक उपक्रमांना महत्त्व देण्यात येत आहे. पर्यावरण संवर्धनासोबतच पारंपरिक कलांचे जतन, स्थानिक कलांना प्रोत्साहन आणि ग्रामीण भागातील कारागिरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत.

गणेशोत्सव हा केवळ उत्सव नाही तर तो लोकसंस्कृती, सामाजिक एकोपा, पर्यावरण संवर्धन आणि जबाबदारीची शिकवण देणारे व्यासपीठ आहे. आनंद साजरा करताना आपला उत्सव पर्यावरणासाठीही मंगलमय ठरावा, यासाठी प्रत्येकानं छोटंसं का होईना पण जबाबदारीनं, आणि मनापासून एकेक पाऊल सकारात्मक दिशेनं उचलणं काळाची गरज आहे.

श्री गौरी –गणेशाच्या भक्तीचा उत्साह कायम ठेवून, सामाजिक भान राखून आणि भावी पिढीचे भविष्य सुरक्षित ठेवून यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करुया आणि या उत्सवाचा आनंद द्विगुणीत करुया!

**वृषाली पाटील-**
**सहायक संचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**

# महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालतचे लातूर जिल्ह्यात ३० सप्टेंबर रोजी आयोजन

लातूर, (जिमाका): राज्य शासनाच्या महसूल व वन



विभागाच्या शासन निर्णयानुसार महसूल प्रशासनातील मंडळ अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी तसेच जिल्हाधिकारी यांच्या अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये जमिनींशी संबंधित व इतर प्रलंबित असलेले विविध महसुली दावे व अपीले सामंजस्याने व कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी लातूर जिल्ह्यात येत्या ३० सप्टेंबर २०२६ रोजी महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या मार्गदर्शनानुसार अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा वकील मंडळाच्या पदाधिकाऱ्यांसोबत पूर्वतयारी बैठकीचे आयोजन करण्यात आले.

या बैठकीस उपजिल्हाधिकारी (भूसंपादन समन्वय) श्रीमती संगिता टकले, विधी अधिकारी ड. वर्षा खोडसे यांच्यासह जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ड. शिवकुमार जाधव, उपाध्यक्ष ड. लहु चामे, सचिव ड. गुरुप्रसाद येरटे व सहसचिव ड. सिद्धेश्र्वर धायगुडे उपस्थित होते. या अभियानात जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी व पक्षकारांनी आणि विधिज्ञांनी सहभागी होऊन आपले दीर्घकाळ प्रलंबित महसुली वाद तडजोडीने संपवावेत, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी श्रीमती करमरकर यांनी यावेळी केली.

क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून तसेच त्यांच्या सामाजिक न्याय व शेतकरी कल्याणाच्या मूळ विचारांना स्मरून हे अभियान राज्यभरात राबविण्यात येत आहे. महसुली दाव्यांमध्ये एका स्तरावर निकाल लागल्यानंतर निकाल विरोधात लागलेले पक्षकार वरिष्ठ न्यायालयात अपील किंवा पुनरीक्षण अर्ज दाखल करतात, ज्यामुळे हे दावे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. विधी सेवा प्राधिकरणाच्या लोक अदालतीच्या धर्तीवर महसुली न्यायालयात प्रलंबित दावे दोन्ही पक्षकारांच्या सहमतीने व कायदेशीर तडजोडीने निकाली काढल्यास अर्धन्यायिक यंत्रणेवरील ताण कमी होऊन नागरिकांची मोठी बचत होणार आहे. या अभियानांतर्गत दर तीन महिन्यांतून एकदा मंडळ अधिकारी ते जिल्हाधिकारी अशा सर्व स्तरांवर लोक अदालतीचे नियमित आयोजन केले जाणार आहे.

लातूर जिल्ह्यातील सर्व तालुका, उपविभाग व जिल्हा स्तरावर बुधवार, दिनांक ३० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ४ या वेळेत महसूल लोक अदालतीचे आयोजन केले जाईल. त्यापूर्वी पक्षकारांना योग्य ते मार्गदर्शन व कायदेशीर सल्ला मिळावा यासाठी सोमवार, २१ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ४ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालय व सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालयांच्या ठिकाणी विधी सल्लागारांच्या सहकार्याने विशेष समुपदेशन केंद्र कार्यान्वित केले जाणार आहे.

ज्या अर्धन्यायिक न्यायालयात दावा प्रलंबित असेल तेथे दोन्ही पक्षकारांनी संयुक्त स्वाक्षरीसह आणि आपल्या वकिलांमार्फत विहित 'प्रपत्र–अ' मधील नमुन्यात किमान पाच दिवस आधी तडजोड अर्ज व कायदेशीर तडजोडनामा सादर करणे आवश्यक राहील.

जर एखादा पक्षकार आपले अपील परत घेणार असेल तर तसा अर्ज दाखल करावा लागेल. प्राप्त अर्जांची प्राथमिक छाननी करून दोन्ही पक्षांच्या संमतीची खात्री झाल्यानंतर महसूल लोक अदालतीच्या दिवशी दोन्ही पक्षांच्या उपस्थितीत अंतिम आदेश पारित करून प्रकरण कायमस्वरूपी निकाली काढले जाईल, असे लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सांगण्यात आले आहे.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर – ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक – रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
PRGI No.: - MAHMAR/2017/72894